**मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल क्रिमीनल अपिल क्र.१३५/२०१० (बुधादेव करमास्कर विरुध्द स्टेट ऑफ वेस्ट बेंगॉल व इतर) मधील आदेशानुसार वेश्या व्यवसाय करुन उदरनिर्वाह करणाऱ्या महिलांना कोवीड-१९ च्या प्रादुर्भाव कालावधीमध्ये अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**महिला व बाल विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांक -न्यायाप्र-२०२०/प्र.क्र.१३० (भाग-१)/का-०२**

नविन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक-२६ नोव्हेंबर, २०२०.

**संदर्भ :-**

१. मा.सर्वोच्च न्यायालयातील दाखल क्रिमीनल अपिल क्र.१३५/२०१० (बुधादेव करमास्कर विरुध्द स्टेट ऑफ वेस्ट बेंगॉल व इतर) मधील दि.२१.९.२०२० व दि.२८.१०.२०२० रोजीचे आदेश.
२. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांचे पत्र क्र.मबाविआ/मवि/मा.सर्वो.न्यायप्र/देविम/का-६/२०२०-२१/४०००, दि.१७.११.२०२०.
३. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांचे पत्र क्र.मबाविआ/मवि/मा.सर्वो.न्यायप्र/देविम/का-६/२०२०-२१/४०६८, दि.२६.११.२०२०.

**प्रस्तावना :-**

मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल क्रिमीनल अपिल क्र.१३५/२०१० (बुधादेव करमास्कर विरुध्द स्टेट ऑफ वेस्ट बेंगॉल व इतर) मधील दि.२१.९.२०२० व दि.२८.१०.२०२० रोजीच्या आदेशानुसार वेश्या व्यवसाय करुन उदरनिर्वाह करणाऱ्या महिलांना कोवीड-१९ च्या प्रादुर्भाव कालावधीमध्ये आर्थिक सहाय्य देणेबाबतचे निदेश प्राप्त झाले आहेत. त्यानुसार वेश्या व्यवसाय करुन उदरनिर्वाह करणाऱ्या महिलांना अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल क्रिमीनल अपिल क्र.१३५/२०१० (बुधादेव करमास्कर विरुध्द स्टेट ऑफ वेस्ट बेंगॉल व इतर) मधील दि.२१.९.२०२० व दि.२८.१०.२०२० रोजीच्या आदेशानुसार वेश्या व्यवसाय करुन उदरनिर्वाह करणाऱ्या महिलांना कोवीड-१९ च्या प्रादुर्भाव कालावधीमध्ये अर्थसहाय्य अदा करण्याची कार्यवाही खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे. : -

१) मा.सर्वोच्च न्यायालयातील दाखल क्रिमीनल अपिल क्र.१३५/२०१० (बुध्ददेव करमास्कर विरुध्द स्टेट ऑफ वेस्ट बेंगॉल व इतर) या प्रकरणामध्ये दि.२८.१०.२०२० रोजीच्या आदेशानुसार वेश्या व्यवसायात कार्यरत महिला व त्यांच्या मुलांना माहे ऑक्टोबर, २०२० ते डिसेंबर, २०२० या ३ महिन्याच्या कालावधीतील अर्थसहाय्यासाठी **"परिशिष्ट-अ"** मध्ये नमूद ३२ जिल्ह्यांना एकूण ₹५१,१८,९७,५००/- (अक्षरी रुपये एकावन्न कोटी अठरा लक्ष सत्त्यान्नव हजार पाचशे फक्त) इतका निधी मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून उपलब्ध करण्यात येत आहे.

२) National Aids Control Organization (NACO) या संस्थेकडून वेश्या व्यवसायात कार्यरत ओळख निश्चित केलेल्या महिलांना प्रतिमाह ₹५,०००/- व ज्या महिलांची मुले शाळेत जातात अशा महिलांना अतिरिक्त ₹२,५००/- कोणत्याही ओळखपत्राचा आग्रह न धरता आर्थिक सहाय्य उपलब्ध करण्यात यावे.

३) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निदेशानुसार वेश्या व्यवसाय करुन आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या महिलांना कोरडे अन्नधान्य व रोख आर्थिक सहाय्य यासारख्या मुलभूत सेवा पुरविण्याच्या अनुषंगाने जिल्हानिहाय प्रस्ताव पुढील कार्यवाहीकरिता आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांना सादर करण्याकरिता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे. :-

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | जिल्हा पुरवठा अधिकारी | सदस्य |
| ३ | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | सदस्य |
| ४ | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांचा प्रतिनिधी | सदस्य |
| ५ | महिला पोलिस अधिकारी (पोलिस आयुक्त/ जिल्हा पोलिस अधिक्षक यांच्याव्दारे नामनिर्देशित) | सदस्य |
| ६ | नॅशनल एड्स कंट्रोल ऑर्गनायझेशन (NACO) यांचा जिल्हास्तरीय प्रतिनिधी | सदस्य |
| ७ | स्वयंसेवी संघटनांचा प्रतिनिधी | निमंत्रित सदस्य |
| ८ | जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी | सदस्य सचिव |

४) आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे कार्यालयाकडून प्राप्त एकत्रित निधीचा प्रस्ताव महिला व बाल विकास विभागाकडून मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षास सादर करण्यात येतील.

५) मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामार्फत प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने संबंधित जिल्हाधिकारी यांना निधी उपलब्ध करुन देण्यात यावा.

६) मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडून प्राप्त निधी वितरणाची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.

७) मा.सर्वोच्च न्यालयाच्या निदेशानुसार मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून उपलब्ध करण्यात येणाऱ्या अर्थसहाय्याची प्रतिपूर्ती महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन) यांच्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून करण्यात येईल.

८) जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीकडून निधी वितरणाचे संनियंत्रण आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे हे करतील.

९) सद्य:स्थितीत परिशिष्ट-अ मध्ये नमूद ३२ जिल्हयांव्यतिरिक्त उर्वरीत जिल्ह्यांची आकडेवारी प्राप्त झाल्यानंतर जिल्हानिहाय अर्थसहाय्य उपलब्ध करण्यासाठी उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. तसेच यापुढील कालावधीसाठी राज्यातील सर्व जिल्ह्यातील वेश्या व्यवसाय करुन उदरनिर्वाह करणाऱ्या महिलांना पूर्वलक्षी प्रभावाने दि.१.१०.२०२० पासून शासनाच्या पुढील आदेशापर्यंत अर्थसहाय्य उपलब्ध करण्यात येईल.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२०११२६१७३६५४४२३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAVINDRA SITARAM JARANDE

Digitally signed by RAVINDRA SITARAM JARANDE
DN: CN = RAVINDRA SITARAM JARANDE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = WOMEN AND CHILD DEVLOPMENT
Date: 2020.11.26 17:42:41 +05'30'

**(र.सि.जरांडे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष/ सदस्य, विधानसभा/ विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. मा.मंत्री, नियोजन/ वित्त विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा.मंत्री/ राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
९. सर्व विभागांचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
१०. सचिव, महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन), मंत्रालय, मुंबई
११. सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. संचालक, नॅशनल एड्स कंट्रोल ऑर्गनायझेशन (NACO), मुंबई
१४. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे
१५. सर्व जिल्हाधिकारी
१६. महालेखापाल- महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
१७. महालेखापाल- महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर
१८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१९. उपायुक्त (महिला विकास)/ (बाल विकास), महिला व बाल विकास आयुक्तालय,पुणे
२०. सर्व विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास (आयुक्तालयामार्फत)
२१. सर्व जिल्हा महिला व व बाल विकास अधिकारी (आयुक्तालयामार्फत)
२२. सर्व कार्यासने, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२३. निवड नस्ती, का-०२.

## शासन निर्णय क्र.न्यायाप्र-२०२०/प्र.क्र.१३० (भाग-१)/का-०२, दि. २६ नोव्हेंबर, २०२० चे

### "परिशिष्ट-अ"

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | लाभार्थी महिला | लाभार्थी बालके | अर्थसहाय्य (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | मुंबई शहर | २६८७ | ५०० | ४,४०,५५,००० |
| २ | मुंबईउपनगर | २३०५ | ५०० | ३,८३,२५,००० |
| ३ | ठाणे | ४७६ | ३२९ | ९६,०७,५०० |
| ४ | रायगड | ४०१ | १५ | ६१,२७,५०० |
| ५ | रत्नागिरी | २२ | १२ | ४,२०,००० |
| ६ | सिंधूदुर्ग | २५ | १६ | ४,९५,००० |
| ७ | पालघर | १५५३ | ० | २,३२,९५,००० |
| ८ | पुणे | ७०११ | १००० | ११,२६,६५,००० |
| ९ | कोल्हापूर | ५०० | २४ | ७६,८०,००० |
| १० | सांगली | ९६० | ११४ | १,५२,५५,००० |
| ११ | सातारा | १५३ | ३४ | २५,५०,००० |
| १२ | नाशिक | १६३० | ५७१ | २,८७,३२,५०० |
| १३ | अहमदनगर | ८६५ | २६२ | १,४९,४०,००० |
| १४ | जळगाव | २१६ | ४७ | ३५,९२,५०० |
| १५ | धुळे | १९ | ४ | ३,१५,००० |
| १६ | नंदुरबार | ३०३ | २० | ४६,९५,००० |
| १७ | नागपूर | ६६१६ | २६१ | १०,११,९७,५०० |
| १८ | वर्धा | १०८ | ० | १६,२०,००० |
| १९ | चंद्रपूर | ३९७ | ३१२ | ८२,९५,००० |
| २० | भंडारा | १६ | ० | २,४०,००० |
| २१ | गोंदिया | १३६ | ८२ | २६,५५,००० |
| २२ | अमरावती | ३०५ | ९० | ५२,५०,००० |
| २३ | वाशिम | ७२ | १२ | ११,७०,००० |
| २४ | बुलडाणा | ३० | ० | ४,५०,००० |
| २५ | अकोला | ४७ | ६ | ७,५०,००० |
| २६ | यवतमाळ | ८९३ | ४१० | १,६४,७०,००० |
| २७ | औरंगाबाद | १६८ | ० | २५,२०,००० |
| २८ | जालना | १७४ | २१ | २७,६७,५०० |
| २९ | परभणी | ५७३ | १७८ | ९९,३०,००० |
| ३० | हिंगोली | ३५ | २ | ५,४०,००० |
| ३१ | लातूर | ११४२ | ० | १,७१,३०,००० |
| ३२ | नांदेड | १०६३ | १६२९ | २,८१,६२,५०० |
| **एकूण** | | **३०९०१** | **६४५१** | **५१,१८,९७,५००** |

RAVINDRA SITARAM JARANDE

Digitally signed by RAVINDRA SITARAM JARANDE
DN: CN = RAVINDRA SITARAM JARANDE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = WOMEN AND CHILD DEVLOPMENT
Date: 2020.11.26 17:43:22 +05'30'

(र.सि.जरांडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन